प्रकाश महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

◆ भंडारा, २२ ऑगस्ट

क्विक हिल फाऊंडेशनसोबत सुरू झालेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अंतर्गत कारधा येथील प्रकाश कनिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडाराच्या संगणकशास्त्र विभागाचे वृषांक लांडगे व जय धनरे या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन करीत सायबर सुरक्षेची गरज अधोरेखित केली.

मोबाईलचा वापर करीत असताना इंटरनेट व सायबर सुरक्षित व सतर्क राहणे गरजेचे असते, हे विद्यार्थ्यांना उदाहरणासह पटवून दिले. सायबर वॉरिअर वृषांक लांडगे व जय धनरे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत इत्यंभूत माहिती देऊन स्वतःला व स्वतःच्या परिवाराला कसे सुरक्षित राहावे याबाबत उत्कृष्ट मार्गदर्शन केले. प्रकाश विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना क्विक हिल फाऊंडेशनतर्फे उत्कृष्ट व्यासपीठ मिळाले असल्याचे शिक्षिका खानापूरकर यांनी सांगितले व यासाठी फाऊंडेशनच्या अनुपमा काटकर व अजय शिर्के यांचे आभार मानले.

◀(तभा वृत्तसेवा)